ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 3.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

Volume I ISSUE I April to June 2023



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Prof.Dr.Sadashiv H. Sarkate

r of Knowledge Peer Review Journal,Volume:I, Issue: I April to June 2023 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286

अनुक्रमणिका


| . | प्रकरण | संशोधक | पृ.क्रं. |
|---|---|---|---|
| | Financial Inclusion and Its Relationship with Financial Literacy | Dr. Mahadeo Yadav | 1-5 |
| | Franchising: Retaining and Expanding Customer Base | Prof. Dr.Landge Balwant B.<br>Mrs. Pallavi Sandeep Gawaree | 6-10 |
| | Public Expenditure On Education In India: What Budget 2023-24 Offers For School Children? | Sachin B. Bahule<br>Suraj S. Karande | 11-19 |
| | Self-concepts among under graduate students of different streams | Dr. Gauri M. Kulkarni | 20-25 |
| | सदगुरू अच्युताश्रमस्वामी चरित्र लीळामृत-एक- चिंतन (भाग-१) | प्रा. डॉ. मेधा गोसावी | 26-31 |
| | जी.ए.कुलकर्णींचा कथासंग्रह 'निळासावळा' : मानवी वेदनेचे सुरम्य चित्रण | प्रा. डॉ. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 32-38 |
| | शेतात खतांची गरज आणि गावांमधील खतांची साधने | प्रा.पंकज पुरुषोत्तम मानकर<br>प्रा.डॉ. जे.डी.पोर | 39-44 |
| | संत तुकारामांच्या अभंगातील सामाजिकतेचे दर्शन | प्रा. डॉ. र. तु. देशमुख | 45-50 |
| | प्र. के. अत्रे : व्यक्ती आणि वाङ्मय | डॉ. राजाराम सोनटक्के | 51-56 |
| | ई-लर्निंग पर्यावरण, अडथळे आणि आव्हाने' | श्रीमती नाटकर संगीता शेषराव | 57-64 |
| | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार | प्रा. डॉ. विद्यासागर पुंडलिक सोनकांबळे | 65-68 |
| | प्रयोगरूप लोककला : स्वरूप-विशेष (कीर्तन, भारुड, गोंधळ आणि जागरण या लोककलांचा अभ्यास) | प्रा. डॉ. चंद्रकांत वाघमारे | 69-75 |
| 3 | भारत में महिला सशक्तिकरण: चुनौतियाँ एवं सम्भावनायें | प्रभात सिंह कुशवाहा<br>डॉ.राजेश कुमार | 76-82 |
| 4 | हाशिए का समाज और प्रेमचंद की कहानियों के पात्र | प्रा.डॉ.राजकुमार पंडितराव जाधव | 83-86 |
| 5 | आधुनिक मीडिया एवं सूचना का अधिकार | विनय कुमार श्रीवास्तव<br>डॉ.राजेश कुमार | 87-92 |
| 6 | संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या विशेष संस्थेत भारताचे योगदान | प्रा.डॉ. शिवाजी गोविंद दिवाण<br>कृष्णा राजेभाऊ रासवे | 93-97 |
| 7 | प्रशासकीय नोकरवर्गाची राजकीय तटस्थता व प्रशासकीय उत्तरदायित्व | डॉ. बांगर नितीनकुमार बाबासाहेब | 98-102 |
| 8 | 'प्रतिनिधी' : राजकीय कादंबरी — वसंत वरखेडकर | डॉ. राजश्री पाटील | 103-107 |
| 9 | ग्रामीण भारताच्या विकासामध्ये ग्रामीण बँकाची भूमिका एक आढावा | कु.चंद्रमा दिनदयाल मेश्राम | 108-111 |
| 0 | महात्मा फुले यांचे शेतीविषयक विचार | डॉ. शिवाजी काकडे | 112-115 |
| 1 | बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये | धर्मराज केशवराव कटके | 116-121 |

# "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये"

**धर्मराज केशवराव कटके**

सहयोगी प्राध्यापक व लोकप्रशासन विभागप्रमुख,

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी ता. गेवराई, जि. बीड

**प्रस्तावना**

केंद्र शासनाने सन २००२ साली ८६व्या घटनादुरुस्ती कायद्यान्वये कलम २१ "ऋ" अन्वये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला. ८६ व्या घटनादुरुस्तीनुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा कायदा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ जो पारित करण्यात आला, तो भारतात १ एप्रिल २०१० पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मीर वगळता) लागू केला असल्याचे सांगितले आहे. समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साध्य केली जाऊ शकतात. या दृष्टीने हा अधिनियम अमलात आणला आहे. त्यामुळे सहा ते चौदा वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे.

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील प्रकरण १ च्या कलम २ (४) मध्ये स्थानिक प्राधिकरणाची व्याख्या दिलेली आहे. त्याचबरोबर प्रकरण ३ च्या कलम ९ नुसार १३ कर्तव्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. यानुसार महाराष्ट्र शासनाने भौगोलिक क्षेत्रानुसार स्थानिक प्राधिकरणे घोषित केलेली आहेत.

महाराष्ट्रात महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम-१९६१ नुसार जिल्हा परिषदेची कर्तव्ये विहित केलेली आहेत. तसेच ७३ व ७४व्या घटनादुरुस्तीनुसार यामध्ये सुधारणा करून अनेक विषय, जाबाबदाऱ्या व कर्तव्ये जिल्हा परिषदेकडे सोपविलेली आहेत. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकार अधिनियम-२००९ मधील तरतुदींची अंमलबजावणी करणे, ही स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये दि. २० ऑगस्ट २०१४ अन्वये सहा ते चौदा वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास आठवीपर्यंतचे मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा अधिकार प्राप्त करून देण्यासाठी केलेला आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकार प्राप्त अधिकारांचा वापर करून आपल्या राज्यातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यासाठी विविध नियम तयार करते. राज्यात ग्रामीण आणि शहरी अशा दोन भागांसाठी वेगवेगळे शालेय प्रशासन कार्य करत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र शासन निर्णय बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ स्थानिक प्राधिकरणाच्या कर्तव्यांअंतर्गत ग्रामीण आणि शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांची बालकांच्या शिक्षणविषयक अधिकारांची कर्तव्ये निश्चित केली आहेत. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाची अंमलबजावणी करणारा सर्वात मोठा घटक म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पाहिले जाते. खऱ्या अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्था याच शिक्षण अधिकार कायद्याची अंमलबजावणी करतात. महाराष्ट्र शासनाने २०१४ मध्ये ग्रामीण भागातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत आणि नागरी क्षेत्रातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती, कटक मंडळे यांची बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणविषयक अधिकाराच्या अंमलबजावणीनजीकच्या भागात शाळेची स्थापना करणे, बालकांना शाळेतील प्रवेश, उपस्थिती, वंचित व दुर्बल घटकांतील बालकांसाठीच्या २५ टक्के राखीव जागांचे धोरण, शाळेची इमारत, अध्यापन कर्मचारीवर्ग, अध्यापन साधनसामग्री, प्रशिक्षणविषयक सुविधा, अनुसूचित विनिर्दिष्ट केलेली शाळांसाठीची प्रमाणके आणि मानके, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम निर्धारण करून त्या-त्या कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली आहे. यामुळे सहा ते चौदा वर्षे वयोगटातील बालकांपर्यंत प्राथमिक शिक्षण पोहोचले आणि त्यांना शिक्षणविषयक अधिकाराची प्राप्ती होऊन बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणविषयक अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी होईल.

**परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब"**

परिशिष्ट अ मध्ये बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९, स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये यामध्ये ग्रामीण भागातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यांनी पार पाडावयाची कर्तव्ये दिलेली आहेत. यामध्ये सहा ते चौदा वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास आठवीपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा अधिकार प्राप्त होण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांची कर्तव्ये निश्चित केलेली आहेत. परिशिष्ट "अ" मध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यांचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. "ब" मध्ये महानगरपालिका क्षेत्र व नगरपालिका/कटक मंडळे यांचे क्षेत्र निश्चित केले आहे. ग्रामीण क्षेत्रातील सर्व शाळा तसेच नगरपालिका व कटक मंडळे कार्यक्षेत्रातील त्यांचेद्वारा नगरपालिका व कटक मंडळे संचलित शाळा वगळून इतर शाळांचे सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना ठरविलेले आहे. पंचायत समिती कार्यक्षेत्रातील सर्व शाळा (नगरपालिका व कटक मंडळ संचलित शाळा वगळून) निश्चित

करण्यात आलेल्या आहेत. तसेच गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती हे सक्षम प्राधिकारी असतील, जिल्हा परिषद संचलित शाळांसाठी केंद्रप्रमुख हे ग्रामपंचायत क्षेत्रात सक्षम अधिकारी असतील. तसेच महानगरपालिका क्षेत्रासाठी आयुक्त व नगरपालिका कटक मंडळांसाठी मुख्याधिकारी हे कमांडिंग ऑफिसर असतील.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख तसेच आयुक्त, मनपा व मुख्याधिकारी व कमांडिंग ऑफिसर हे आपापल्या कार्यक्षेत्रात अपंग समावेशित शिक्षणातील बालके, अनुसूचित जाती-अनुसूचित जमातीची बालके, दुर्बल व वंचित घटकातील बालके आणि मुलांचे शिक्षण याबाबतीत पर्यवेक्षण व यादृच्छिक (Random) तपासणी करतील. ते आपआपल्या कार्यक्षेत्रात शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीबाबत संनियंत्रण करतील. गटशिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुख हे आपल्या कार्यक्षेत्रातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांची माहिती जतन करणे, अद्ययावत करणे, शाळाबाह्य मुलांची माहिती मिळवणे, ही कर्तव्ये पार पाडतील. शाळाबाह्य बालकांना शाळेत दाखल करून घेण्यासाठी बालकांचे व पालकांचे उद्‌बोधन करून बालकास शाळेत दाखल करून घेणे, आपल्या कार्यक्षेत्रात २५ टक्के आरक्षणाची आरक्षणांतर्गत द्यावयाची प्रक्रिया पारदर्शक असल्याची खात्री करणे, मार्गदर्शन करणे व प्रत्यक्ष लाभार्थ्याला प्रवेश मिळेल व शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी प्रयत्न करणे.

परिशिष्ट अ व परिशिष्ट ब मधील (ख) मध्ये शिक्षण हक्क कायदा २००९ मधील कलम ६ च्या अंमलबजावणीसाठी कलम-९ नुसार बालकांच्या नजीकच्या क्षेत्रामध्ये शाळा उपलब्ध असल्याची खात्री करण्याचे कार्य जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी करतात. नजीकच्या क्षेत्रात शाळा उपलब्ध नसल्यास ग्रामपंचायतीकडून शाळा उपलब्धतेबाबत सर्वेक्षण करून पंचायत समिती, गटशिक्षणाधिकाऱ्यामार्फत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर केले जातात. तसेच स्थानिक पातळीवर समाज, पालक, विद्यार्थी ग्रामपंचायत सदस्य शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांच्यामध्ये कायद्याची जनजागृती करणे, त्याची कर्तव्ये व जबाबदारीची जाणीव करून दिली जाते. शिक्षण हक्क कायद्याबाबत अधिनस्थ यंत्रणेची जाणीव जागृती केली जाते.

परिशिष्ट "अ" व "ब" मधील (ग) नुसार जिल्हा परिषद स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, गटशिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुख व शहरी भागात आयुक्त, मनपा व मुख्याधिकारी व कमांडिंग ऑफिसर हे वंचित व दुर्बल घटकांतील बालकास कोणत्याही कारणांवरून प्राथमिक शिक्षण घेण्यापासून ते पूर्ण करण्यापासून त्यास प्रतिबंध केला जाणार नाही. यादृष्टीने बालकांची उपस्थिती व नियमितता याची खात्री करणे, अधिनस्थ यंत्रणेची याबाबत जागृती करणे व कोणत्याही प्रकारचा भेदभाव होणार नाही, या दृष्टीने संनियंत्रण व पर्यवेक्षण करणे.

परिशिष्ट "अ" व "ब" मधील (ग) नुसार विहित दस्तऐवजाच्या आधारे प्रवेश निर्धारित करणे,

शाळेमार्फत ६ ते १४ वर्षे वयापर्यंतच्या बालकांचे वैयक्तिक अभिलेखे अद्ययावत करणे, जतन करणे, तसेच शाळेत असुरक्षित बालकांच्या गटामध्ये दुर्लक्षित १ निराधार विशेष गरजाधिष्ठित एकच पालक असलेली बालके, अनाथ/बेघर इत्यादी बालकांच्या नोंदी करणे, राज्य स्तरावरून पुरविण्यात आलेल्या प्रपत्रात नजीकच्या शाळेच्या माहितीचे एकत्रीकरण व संगणकीकरण करून जिल्ह्यास उपलब्ध करणे. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर व मनपा व नगरपालिका/कटक मंडळे स्तरावर सक्षम प्राधिकाऱ्यांचे कर्तव्य निश्चित केले आहे.

परिशिष्ट अ मधील (३) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, गटशिक्षणाधिकारी आणि केंद्रप्रमुख तसेच मनपा आयुक्त व नगरपालिका मुख्याधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रात कोणतेही बालक वंचित राहणार नाही, याबाबत संनियंत्रण करणे. स्थलांतरित बालकांचे अभिलेख जतन करून ठेवणे. प्रवेशासंबंधी येणारे अडथळे व उपस्थिती टिकविण्याबाबत गाव स्तरावर संनियंत्रण व मार्गदर्शन करणे.

परिशिष्ट अ, परिशिष्ट ब मधील (च) अन्वये शिक्षण हक्क कायदा २००९ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या प्रमाणानुसार जिल्हा परिषदेने आपल्याकडे उपलब्ध स्रोतांमधून शिक्षकाची पूर्तता करणे. तसेच केंद्रप्रमुखाने शिक्षक-विद्यार्थी प्रमाण राखण्याबाबत उद्‌भवणाऱ्या समस्यांबाबत वरिष्ठांकडे पत्रव्यवहार करणे. शाळांना शैक्षणिक साहित्य, खेळांचे साहित्य उपलब्ध करून देणे. आवश्यकतेप्रमाणे नवीन शाळा स्थापन करावयाची असल्यास बांधकामासाठी लागणारा निधी तात्काळ वितरित होईल याची खात्री करणे. शिक्षक उपलब्ध करून घेणे. शिक्षकांचे समायोजन व विषयनिहाय नियुक्ती करणे. परिशिष्ट अ व परिशिष्ट ब मधील (घ) मध्ये शिक्षक हक्क कायदा कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेली विशेष प्रशिक्षण सुविधा पुरविणे आणि स्थलांतरित कुटुंबातील बालकांचा प्रवेश करणे, या दृष्टीने जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर तसेच मनपा, नगरपालिका व कटक मंडळ हे सक्षम प्राधिकाऱ्यांच्या अंतर्गत पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्याची तरतूद केलेली आहे.

शिक्षण हक्क कायद्यामध्ये अनुसूचित विनिर्दिष्ट केलेली मानके व निकष यांना अनुरूप असणाऱ्या उत्तम दर्जाच्या प्राथमिक शिक्षणाची सुनिश्चिती करणे, शिक्षकांचे समायोजन करणे, शाळा मंजूर असलेल्या ठिकाणी प्रगतिपथावरील व पूर्ण झालेल्या भौतिक सुविधांचे पर्यवेक्षण व संनियंत्रण करणे, शाळाबाह्य मुलांना शाळेत प्रवेश देऊन त्यांची उपस्थिती व प्रशिक्षणासाठी साहाय्य करणे. तसेच ग्रामसभेच्या बैठकीस शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व मुख्याध्यापक यांना ग्रामपंचायत स्तरावर बोलावणे, अशी कर्तव्ये या कायद्यानुसार निश्चित केलेली आहेत. शिक्षण हक्क कायदा २००९ मधील कलम ९ नुसार पाठ्यपुस्तके आणि अध्ययन-अध्यापन साहित्य इत्यादी प्रत्येक शाळेत वेळेत वितरित होईल, याची खात्री करणे. शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळांचे कामकाजाचे दिवस, प्रत्यक्ष अध्यापनाचे तास, यानुसार शाळांचे कामकाज चालते किंवा नाही, याबाबत खात्री करणे. बालकांच्या शाळेतील

उपस्थितीबाबत गाव समुदायाचे उद्बोधन करणे आणि बालकांच्या प्रगतीविषयी पालक समाज यांच्याशी शाळांनी संवाद साधणे. यासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत तसेच मनपा व नगरपालिका यांची कर्तव्ये निश्चित केलेली आहेत.

परिशिष्ट अ व परिशिष्ट ब (च) नुसार ग्रामीण भागातील व शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्थानिक शाळेतील शिक्षक विविध स्तरीय प्रशिक्षणाचा लाभ घेत आहेत, याची खात्री करणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था गटसाधन केंद्र यांच्याशी चर्चा करून शिक्षक प्रशिक्षणाचे वेळापत्रक तयार करण्याचे कार्य मुख्य कार्य अधिकारी हे करतात. शिक्षकांसाठी एखादे विशेष प्रशिक्षण आवश्यक असल्यास संबंधित संस्थेमार्फत उपलब्ध करून देणे. नवनियुक्त शिक्षकांना सेवापूर्व प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे. समाजाचा शालेय सहभाग वाढविण्यासाठी त्यांचे क्षमतेत वाढ करण्यासाठी गटसाधन केंद्र स्तरावरून द्यावयाच्या प्रशिक्षणाची निश्चिती करणे.

परिशिष्ट अ व परिशिष्ट ब मधील (थ) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी आणि केंद्रप्रमुख तसेच मनपा आयुक्त, नगरपालिकेचे मुख्याधिकारी कमांडिंग ऑफिसर, कटक मंडळे आपल्या अधिकार क्षेत्रातील शाळांच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे. जिल्ह्यातील व शहरातील प्राथमिक शाळांची वाढ, व्यवस्थापन, पर्यवेक्षण आणि शाळा भेटी इत्यादी बाबींचे संनियंत्रण करणे. जिल्ह्यातील माध्यमिक शाळांची वाढ, व्यवस्थापन, पर्यवेक्षण आणि शाळा भेटी इत्यादी बाबींचे संनियंत्रण करणे. गाव स्तरावरून प्राप्त तक्रारींचे निरीक्षण करणे. शालेय इमारतीची देखभाल करणे, तसेच शाळेचा परिसर हा फक्त शालेय कामकाजासाठी वापरला जाईल, यासंबंधीचे पर्यवेक्षण करणे. शाळेच्या कामकाजाबाबत जिल्हा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांच्याशी पत्रव्यवहार करणे.

शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांनी शाळा विकास आराखडा तयार केल्याची खात्री करणे. शिक्षण हक्क कायद्यातील तरतुर्दीनुसार कामकाज चालत नसेल तर अशा शाळांचे मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य यांच्याशी संवाद साधून शाळा शिक्षण हक्क कायद्याशी अनुरूप करणे. शाळांच्या गरजांची निश्चिती करून शाळा विकास आराखडा शाळा व्यवस्थापन समितीकडून तयार करून घेणे इत्यादी कर्तव्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी आणि केंद्रप्रमुख तसेच शहरी भागासाठी मनपा आयुक्त, नगरपालिका क्षेत्रासाठी नगराध्यक्ष व कटक मंडळासाठी कमांडिंग ऑफिसर यांची निश्चिती केलेली आहे.

प्रशासन अधिकारी, महानगरपालिका यांच्याशी पत्रव्यवहार करणे. तसेच नगरपालिका, कटक मंडळे समाधानी नसेल तर येणाऱ्या समस्यांबाबत जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद यांच्याशी पत्रव्यवहार करतील.

ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी

व नागरी भागासाठी महानगरपालिका आयुक्त, मुख्याधिकारी हे आपआपल्या कार्यक्षेत्रात स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये पार पाडण्यात महत्त्वाची भूमिका निभावतात. भारतात सर्वात जास्त प्रमाणात शिक्षणविषयक अधिकारांची अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गतच्या शाळांमधूनच होते. स्थानिक स्वराज्य संस्था जेवढ्या सक्षमपणे आपली शिक्षणविषयक अधिकारांबाबतची कर्तव्ये सक्षमपणे निभावतील, तेवढ्या प्रभावीपणे शिक्षणविषयक अधिकारांची अंमलबजावणी घडून येईल आणि देशातील एकही मूल शाळाबाह्य स्वरूपात राहणार नाही.

संदर्भ ग्रंथ


१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये (२०१४), महाराष्ट्र शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आरटीई-१११४, पृष्ठ क्र. ११९, दि. २० ऑगस्ट २०१४, पृष्ठ क्र. १.

२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९, स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये, महाराष्ट्र शासन, २०१४, पृष्ठ क्र. २१-२२.

३) गवळी सुधीर (प्रकाशक), "भारतीय संविधान", २६वी आवृत्ती, सुधीर प्रकाशन, वर्धा, पृष्ठ क्र. २९१-२९३.

४) घोरमोडे के.यू., २००९, "शैक्षणिक प्रशासन आणि व्यवस्थापन", विद्या प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. १७८.

५) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९, भारत राजपत्र, पृष्ठ क्र. ०२.

६) दुखाने अरविंद, "प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र", नित्यनूतन प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १२८-१२९.

७) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९, २००९ चा अधिनियम क्र. ३५, भारत राजपत्र, एप्रिल २०१६, पृष्ठ क्र. १६.

८) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११, (२०११), महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-चार ब, वर्ष-३, अंक ८४, ११ ऑक्टोबर २०११, पृष्ठ क्र. १४-१५.

९) मंगरुळकर मीना, २००९, भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ क्र. १६४-१६६.


◆◆◆